# ऑडी व क्रेटा कारमध्ये भीषण अपघात

## दर्यापूर-अकोला मार्गावरील लासूर फाट्यानजीक एकमेकांवर धडकली वाहने

### दर्यापूरातील तीन तरुण ठार, तीन जण गंभीर

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.2 )** - ऑडी व ह्युंडाई कंपनीची क्रेटा कार समोरासमोर धडकून झालेल्या भीषण अपघातात दर्यापूरातील तीन तरुणांचा करुण अंत झाला, तर तिघेजण गंभीर जखमी झाले. दर्यापूर-अकोला मार्गावरील लासूर फाट्याजवळ सोमवारी दुपारी 3 वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. अपघातानंतर या मार्गावर काही काळ वाहतुक खोळंबली होती. आनंद उर्फ गोलू बहाकार (वय 26, रा. सांगळूदकरनगर, दर्यापूर), विनीत गजानन बिजवे (38, रा. गजानन मंदिर, साईनगर, दर्यापूर) व प्रतीक माधवराव बोचे (36, रा. सांगळूदकरनगर, दर्यापूर) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात सकलेन आरिफ घाणीवाले (24, रा. शिवाजीनगर, बनोसा), आकाश अग्रवाल व रमेश अग्रवाल हे जखमी झाले. एमएच 27/ डीई 6260 क्रमांकाच्या क्रेटा कारने आनंद, विनीत, प्रतीक व पप्पू हे चौघेजण दर्यापूरहून अकोला येथे जात होते, तर एमएच 29 बीसी 7786 क्रमांकाच्या ऑडी कारने सकलेन घाणीवाले, आकाश अग्रवाल व रमेश अग्रवाल हे दर्यापूरकडे येत होते. लासूर फाट्यानजीक दोन्ही कार समोरासमोर धडकल्या. यात क्रेटा वाहनातील तिघांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती दर्यापुरात हवेसारखी पसरताच मृतक व जखमींची मित्र मंडळींनी अपघातस्थळ गाठले. तीनही मृतदेह उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे शवविच्छेदनाकरिता आणण्यात आले. अग्रवाल पिता-पुत्रांना उपचारासाठी अकोला येथे दाखल करण्यात आले आहे.





विनीत बिजवे | प्रतिक बोचे | आनंद बहाकार





### शहरात पसरली शोककळा

प्राप्त माहितीनुसार घटनेत मृत्यूमुखी पडलेला प्रतीक आदर्श हायस्कूलच्या सेवानिवृत्त शिक्षिका बोचे यांचा मुलगा होता. विनित हा दर्यापूर पंचायत समिती येथे स्थापत्य अभियंता होता. तर आनंद हा आदर्श हायस्कूल चे सेवानिवृत्त शिक्षक धर्माळे यांचा नातू होता. अपघातामधील ऑडी कार ही आकाश अग्रवाल व क्रेटा कंपनीची कार हे प्रतीक बोचे यांची असल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची माहिती येवदा पोलिसांना मिळतात येवदा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला या घटनेने दर्यापूर परिसरात शोककळा पसरली आहे. हे युवक कोठे गेले जात होते, अपघाताची नेमके कारण, अश्या अनेक गोष्टी बातमी लिहेस्तोवर कळू शकल्या नव्हता.



# त्या विनयभंग प्रकरणी अॅट्रॉसिटी दाखल करा!

### बिरसा क्रांती दलाची जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.2 )** - तालुक्यातंर्गत पुसला येथील राजू केदार नामक आरोपीने एका तरुणीचा विनयभंग केला. सदर तरुणी एका विशिष्ट जमातीमधील असल्याने याप्रकरणी आरोपीवर ?ट्रॉसिटी ?क्ट अंतर्गत कारवाई करावी अशी मागणी बिरसा क्रांती दलाचे जिल्हाप्रमुख कमलनारायण उईके यांनी एका लेखी निवेदनाद्वारे तहसीलदार वरुड यांच्यामार्फत जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडे केली आहे.

राजू केदार नामक आरोपी सदर तरुणीला 'तू कुठे जात आहे, तुला गाडीवर बसून सोडून देतो' असे म्हणून तिचा विनयभंग केला. या आरोपीने त्या तरुणीशी लगट करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार पीडित मुलीच्या लक्षात येतात तिने त्याच्या तावडीतून सुटका करण्याचा प्रयत्न केला व लगेच तिचा भाऊ याला फोनवरून घडलेला प्रकार सांगितला. ज्या मुलासोबत सदर मुलीचे लग्न जुळले होते, त्यालाही त्या मुलीने बोलावून घेतले. या घटनेची शेंदूरजनाघाट पोलीस स्टेशनमध्ये तक्रारसुध्दा देण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेताच पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला. परंतु नुसता विनयभंगाचा गुन्हा दाखल करून चालणार नाही, तर त्याच्यावर आदिवासी मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी ?ट्रॉसिटी ?क्ट दाखल करण्यात यावा या मागणीसाठी बिरसा क्रांती दलाचे जिल्हाप्रमुख कमलनारायण उईके यांच्यासह शेकडो कार्यकर्ते तहसील कार्यालयावर जात नायब तहसीलदार सुदर्शन शहारे यांना लेखी निवेदन दिले. जर पीडित मुलीला न्याय मिळाला नाही तर याहीपेक्षा मोठे जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा सतीश उईके, रामदास कोकाटे, गंगाधर कवडेती, उमेश युवनाते, सुंदरलाल बारंगे, कमलवती कुसराम, सुदाम धुर्वे, सुभाष मरसकोल्हे, मुरलीधर मरसकोल्हे, कचरू खवसे, राजू देशमुख, कपिल परिहार, मंगेश गावंडे, विलास मरकाम, योगेश युवनाते व देवानंद उईके यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

**कायद्याप्रमाणे कारवाई करू - ठाणेदार महाडिक**

सदर प्रकरणात आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याला अटक केली असून रिमांडसाठी कोर्टात दाखल केलेले आहे. परंतु अॅट्रॉसिटी अॅक्ट संदर्भात विचारले असता कायद्याप्रमाणे कारवाई करू असे शेंदूरजनाघाटचे ठाणेदार दीपक महाडिक यांनी सांगितले.

# मीटरची गती कमी करुन वीज चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तालाबपुरा येथे वीज मीटरची गती कमी करून वीजचोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. सहाय्यक अभियंता नीलेश अरुणराव गुल्हाने (38) यांच्या फिर्यादीवरून राजापेठ पोलिसांनी फहिमुनिसा इक्बाल खान व अल्ताफ हुसेन यांच्याविरुद्ध अनधिकृतपणे तारा जोडून वीजचोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. वीजचोरी रोखण्यासाठी महावितरणने एक पथक तयार करून तपासणी सुरू केली आहे. तालाबपुरा येथील रहिवासी फहिमुनिसा इकबाल खान हिचे मीटर तपासले असता तिने सीटी बायपास करून मीटरचा वेग कमी केल्याचे आढळून आले. हे अॅक्यूचेक मीटरमध्ये दिसून आले. फहिमुनिसा यांनी आतापर्यंत 16 हजार 295 रुपये किमतीची 1116 युनिट वीजचोरी केली आहे. भाजी बाजार परिसराचे कार्यकारी अभियंता नीलेश गुल्हाने यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी फहिमुनिसाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याच आवारातील अल्ताफ हुसेन याने वीज मीटरला येणाऱ्या व तुटलेल्या इनकमिंग वायरला दुसरी वायर जोडून अनधिकृतपणे वीजचोरी केली. अल्ताफने आतापर्यंत 967 युनिट वीज म्हणजेच 21 हजार 700 रुपयांची वीज चोरी केली आहे. सहायक अभियंता नीलेश गुल्हाने यांच्या फिर्यादीवरून अल्ताफ हुसेनविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'शिवशाही' ची गार हवा ठरताहे औट घटकेची!

## या आरामदायक बसला लालपरीच्या ताफ्यातून बाहेर करण्याच्या हालचाली

### कधीही, कोठेही, केव्हाही पडते आजारी

*नितीन दुर्बुडे*

***पथ्रोट,( दि.2 )*** *- डोक्यावर गारगार हवा, पोटातील पाणी हलत नाही, आणि कधी आपले गंतव्य स्थळ येते हे ही कळत नाही, असा प्रवास. अशी ओळख असलेली म.रा.प.र. महामंडळाच्या ताफ्यातील 'शिवशाही' बस आता बिनभरवश्याची झाली आहे. कधीही, कोठेही, केव्हाही ही बस आजारी पडत असल्याने आता या गार हवेचा प्रवास औट घटकेचा ठरत आहे. त्यामूळे या आरामदायक बसला लालपरीच्या ताफ्यातून बाहेर करण्याच्या हालचाली प्रशासनाकडून होत असल्याची माहिती आहे.*



लालपरीचा प्रवास म्हणजे सर्वसामान्यांसाठी खूप सोयीचा असतो. एसटी महामंडळाने एसटीच्या ताफ्यात अनेक बस दाखल केल्या आहेत. शिवशाही, शिवनेरीच्या रुपाने वातानुकूलित बस खेडोपाडी धावत असतात. मात्र, आता एसटी महामंडळाने मोठा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यातून शिवशाहीचा प्रवास थांबविण्याची शक्यता आहे. वाढत्या अपघात व बिघाड च्या पार्श्वभूमीवर शिवशाही बस गाड्यांमध्ये तांत्रिक दोष असल्याचे निष्पन्न झाल्यावर प्रशासन हा मोठा व महत्त्वाचा निर्णय घेऊ शकते.

शिवशाही बसच्या अंतर्गत व बाह्य रचनेत आवश्यक तो बदल केला जाणार असून त्याचे रूपांतर साध्या अर्थात 'लालपरी' बसमध्ये करण्याचा विचार केला जात आहे. अलीकडेच गोंदिया येथे शिवशाही बसच्या अपघातात 11 प्रवाशांचा मृत्यू झाला होता. यापूर्वीदेखील शिवशाही बसचे अपघात झाले होते. शिवशाही बसचे होणारे अपघात पाहता आधीपासून त्यात तांत्रिक दोष असल्याचे समोर आले आहे. वारंवार तक्रारी वाढल्याने एसटी प्रशासनाच्या वाहतूक विभागाने शिवशाहीला सेवेतून काढून टाकण्याचा प्रस्ताव दिला. येत्या काही महिन्यातच शिवशाहीचा प्रवास संपणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### 392 शिवशाही नादुरुस्त

सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात एकूण 892 शिवशाही बस आहेत. त्यापैकी 500 बस धावत असून उर्वरित 392 बस कार्यशाळेत विविध कारणांसाठी दाखल झाल्या आहेत. शिवशाही बस या वातानुकूलीत बस होत्या. मात्र आता त्याचे लालपरीत रुपांतर करण्यासाठी वातानुकूलित यंत्रणा काढण्यात येणार असून काही आवश्यक बदल केले जाणार आहेत. शिवशाहीचे रूपांतर साध्या बसमध्ये केले जाणार आहे.

### कंत्राटदाराकडून चालविल्या जातात शिवशाही

शिवशाही बस सुरुवातीपासूनच वादात अडकलेल्या होत्या. नियोजनाचा अभाव, कंत्राटदारांची मनमानी, तसेच, वारंवार होणारे अपघात याबरोबरच तिकिट दर जास्त असल्याने शिवशाही सुरुवातीपासून वादाच्या भोवऱ्यात अडकल्या होत्या. वारंवार प्रशासनाकडे तक्रारी देखील केल्या होत्या. पहिल्यांदा शिवशाही बस 10 जून 2017 रोजी मुंबई-राजगिरी मार्गावर धावली होती. तत्कालीन परिवहनमंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांच्या संकल्पनेतून शिवशाही बस सुरू करण्यात आली होती.

# वाटमारी करून व्यापाऱ्याला लुटले

**मोर्शी** - मोर्शी येथील म्हशीचा व्यवसाय करणारे एक व्यावसायिक म्हशी खरेदी करिता मध्यप्रदेशमध्ये गेले होते. दरम्यान त्यांना अज्ञात व्यक्तींनी वाटमारी करित व्यापाऱ्याला बेदम मारहाण करून त्याच्याकडील 78 हजार रोख व सोन्याची अंगठी लुटून पसार झाले. येथील गेडामपुरा परिसरातील रहिवासी सागर मोहनआप्पा एकोतखाने (26) हा म्हशींच्या खरेदी विक्रीचा व्यवसाय करतात. रविवार 1 नोव्हेंबर रोजी मध्य प्रदेशातील आठनेर या गावी म्हशी खरेदीकरिता गेले होते. तेथून परत येताना पचमोह गावाजवळ रात्री 10 वाजताच्या सुमारास दोन-चार अज्ञात दुचाकीस्वारांनी त्यांची टाटा इंडिका क्र. एम एच 4 ई टी 3536 त्याचे वाहन थांबवले. त्यांना वाहनातून बाहेर काढले व बेदम मारहाण केली. तसेच धारदार शस्त्राने त्याच्या छातीवर व पोटावर वार करून त्याच्या जवळील 78 हजार रोख व सहा ग्रॅमची सोन्याची अंगठी हिसकावून तिथून पळ काढला. अचानक झालेल्या या घटनेने भांबावलेल्या सागरने तिथून आपले वाहन घेऊन पळ काढला व मोर्शी पोलिस स्टेशनला येऊन रात्री उशिरा तक्रार दाखल केली.


## जाहीर नोटीस

अमरावती शहरातील मालमत्ता पत्रक गाव पेठ अमरावती सीट नंबर 18 ब सुंदरलाल चौक येथील भूमापन क्रमांक 18 बी सीट नंबर 18 बी प्लॉट नंबर 3 क्षेत्रफळ चौरस मीटर 3025.90 धरणाअधिकारी ब मूळ धारक युनायटेड चर्च जमीन ट्रस्ट असोशियन कॅम्प अमरावती येथील जमीन श्री सोलोमन स्मिथ हे इंडियन कॅनडियन प्रेसबायटेरियन चेअधिकृत मॉडरेटर होते त्यांच्या मृत्युपस्त्यात श्री राजेश हिरालाल भारती हे अधिकृत मॉडेरेटर आहेत इंडियन कॅनडियन प्रेसबायटेरियन मिशनच्यासर्व अधिकार आहेत ही मालमत्ता कुशल चौधरी यांनी राजेश भारती यांच्याकडून विकत घेण्याचा करारनामा केला आहे तरी कोणाची काही तक्रार असल्यास किंवा कोणतेही कागदपत्र कोणाचे इकडे असल्यास करारनामा झाल्यास असल्यास विक्री पावती झाले असल्यास 21 दिवसाच्या आत खालील पत्त्यावर संपर्क करावा न केल्यास सदर व्यवहार योग्य आहे असे गृहीत धरून आम्ही नियमानुसार कायद्यानुसार व्यवहार करू व पुढील व्यवहार कायम स्वरूपी ठेव.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**कुशल चौधरी ( पत्रकार )**
**चैतन्य कॉम्प्लेक्स डीपी रोड**
**अंजनगाव सुर्जी जिल्हा अमरावती**
**मोबाईल नंबर - 9561614111**
**9067264111**



**•जाहीर नोटिस•**

**प्रती,**

**संपादक साहेब,**

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे **"हिम्मतराव नारायनराव येवले"** यांच्या वतीने सदरची जाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन - मौजे- धनेगाव, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. 298, वार्ड क्रं. 2, ता. अंजनगाव सुर्जी, जिल्हा. अमरावती.**

**चतु: सीमा:**

**पुर्व- राहुल येवले** | **पश्चिम- रस्ता,**

**उत्तर- अंजनाबाई** | **दक्षिण- रस्ता.**

सदर मिळकत नामे **"हिम्मतराव नारायनराव येवले"** यांना ग्रामपंच्यायत **धनेगाव.** यांचा तपशील आणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहे **तसेच वरील वर्णनाची नमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे.** त्यानंतर त्यांनी **"PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD. BR AMRAVATI.** येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठे गहान/राष्ट्रीयकृत/खाजगी/पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, सदर मालमतेवीषयी शासकीय-नीमशासकीय-इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या **7 (सात)** दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

**आपला**
**Advocate**
**रवींद्र र वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो. नं. 9823698745**



# अमरावती महानगरपालिका, अमरावती

## उद्यान विभाग

## निविदा सुचना

कार्यालय- महानगरपालिका अमरावती
अमनपा/उ.वि/जा.क्र./१३२२/२०२४
दिनांक ०२/१२/२०२४

खालील कामा करीता कामाचा अनुभव असलेल्या पंजीबद्ध सेवा सहकारी संस्था/कॉन्ट्रक्टर यांचेकडून द्वि लखोटा पद्धतीने मोहोर बंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदा दोन स्वतंत्र लखोट्यातून सादर करावयाचे आहेत. लखोटा क्रमांक १ व २ मध्ये दयावयाच्या अटी व शर्ती उद्यान विभाग कार्यालयातून निविदे सोबत उपलब्ध करून द्यावे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा रक्कम | | कोऱ्या निविदा प्रपत्राची किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नगदी | देयकातून | | |
| १ | मनपा परांजपे कॉलनी उद्यान निगा राखणे | २,२३,३८०/- | १ % | १ % | १० % | ५००/- +१८ % GST | १२ महिने |
| २ | मनपा अर्जुन नगर उद्यान निगा राखणे | २,२३,३८०/- | १ % | १ % | १० % | ५००/- +१८ % GST | १२ महिने |
| ३ | मनपा भेरडे ले-आऊट उद्यान निगा राखणे | २,२३,३८०/- | १ % | १ % | १० % | ५००/- +१८ % GST | १२ महिने |
| ४ | मनपा भुमी पुत्र कॉलनी उद्यान निगा राखणे | २,२३,३८०/- | १ % | १ % | १० % | ५००/- +१८ % GST | १२ महिने |
| ५ | मनपा जिवण ज्योती कॉलनी उद्यान निगा राखणे | २,२३,३८०/- | १ % | १ % | १० % | ५००/- +१८ % GST | १२ महिने |

१) कोरे निविदा प्रपत्र निविदा प्रसिद्धी पासून दि. १२/१२/२०२४ पर्यंत उद्यान विभाग कार्यालयीन वेळेत निविदा प्रपत्राची योग्य किंमत उदा केल्यावर प्राप्त होतील.

२) कामाच्या सविस्तर अटी व शर्ती उद्यान विभागात कार्यालयीन वेळात अवलोकनार्थ उपलब्ध असून त्या निविदा धारकांना बंधनकारक राहतील.

३) मोहरबंद लखोट्यातील निविदा दिनांक १३/१२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मा. उपायुक्त (सा.) यांचे कार्यालयात स्विकारल्या जातील. त्यांचे प्रतिनिधी समक्ष निविदा छाननी समिती समक्ष उघडण्यात येतील तसेच शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील.

४) निविदा धारकाने नमूद केलेल्या दर निविदा उघडण्याचे तारखेपासून ३० (तीस दिवस) दिवसापर्यंत बंधनकारक राहतील.

५) अटी अथवा दोष पूर्ण निविदाचा विचार केल्या जाणार नाही. तसेच सर्व अथवा कोणतेही निविदा, कोणतेही कारण न दर्शविता रद्द करण्याचा मा. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

६) सदर निविदा प्रक्रिये नंतर वाटाघाटी अंती दर अंतिम केल्या जाईल.

**अमनपा/जसंवि/१७६/२०२४ दिनांक २१/१२/२०२४**

**सिस्टीम मॅनेजर**
**महानगरपालिका, अमरावती**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४


# बेलोरा विमानतळावरील वन्यप्राणी सैरावैरा

## वन्यप्राण्यांचा जीव धोक्यात असल्याचा वन्यप्रेमीचा आरोप | बोमा पध्दत फेल ठरल्याची चर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 2)** - बेलोरा विमानतळाची विकासकामे ही अंतिम टप्प्यात आली आहेत. मात्र, येत्या काळात विमानांचे 'टेक ऑफ, लँडिंग'साठी अडसर ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना विमानतळ परिसरातून बाहेर काढण्यात अद्यापपर्यंत यश आले नाहीत. वन्यप्राण्यांना पकडण्यासाठी 'बोमा' पद्धतीचा वापर केला जात आहे. परंतू तरीही वन्यप्राणी पकडण्यात पूर्णपणे यश मिळालेले नाही. त्यामुळे आता कंत्राट पध्दतीने घेतलेल्या मजूरांच्या मदतीने वन्यप्राण्यांना पकडण्याचे प्रयत्न सुरु आहेत. परंतू हा प्रकार वन्यप्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण करू शकतो, असा आरोप काही वन्यप्राणीप्रेमींनी केला आहे.



वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाने विमानतळाच्या परिसरात बोमा पध्दतीने रेस्क्यूची कार्यवाही सुरू केली आहे. लवकरच वन्यप्राण्यांचे 'ट्रॅप' करून त्यांना त्यांच्या अधिवासात सुरक्षितपणे पाठविले जाणार आहे. परंतू वनविभागाकडूनच वन्यप्राण्यांना पकडण्याचे काम शिकार करणार्यांना नागरिकांना दिल्या गेल्याचा आरोप वन्यप्रेमी करु लागले आहेत. वन्यप्राणी व्यवस्थापनाकरिता वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना परदेशात पाठवून बोमा या पद्धतीच्या प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी लाखो रुपये खर्च करून गुजरात येथे प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात आले. तेथून परत येताच कार्यवाही सुरु झाली. बेलोरा विमातळावरील 150 प्राण्यांना बाहेर काढण्याकरिता 200 अधिकारी, कर्मचारी कामाला लागले. यासाठी लाखो रुपये खर्च करूनही केवळ एक हरीण महिन्याभरात पकडल्याची गेल्याची माहिती पुढे आली आहे. वन्यप्राण्याना पकडणे बरेच कठीण जात असल्याने आता वनविभागाने विशिष्ट समाजाच्या लोकांची मदत घेतली आहे, असा आरोप वन्यप्रेमींनी केला आहे.

> वनविभाग जर वन्य प्राणी पकडण्याकरिता शिकारी लोकांची मदत घेत असेल, तर इतर जंगलातील वन्य प्राण्यांचे संरक्षण होईल का ? उदाहरणार्थ अंजनगाव सुर्जी वाघ शिकार प्रकरण पुढे आहे.
>
> **अभिलाष व्यवहारे,**
> **अध्यक्ष,वारसा संस्था, मोर्शी.**

> बेलोरा विमानतळ परिसरातील वन्यप्राण्यांना हलविण्याकरिता वनविभागाकडे प्रशिक्षित मनुष्यबळ असतांना सुद्धा शिकाऱ्यांची मदत घेतली आहे. हे नियमबाह्य आहे. या प्रकरणात लवकरच वरिष्ठांकडे तक्रार दाखल करण्यात येणार असून संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाहीची मागणी करणार आहे.
>
> **सागर अ. मैदानकर,**
> **प्रतिनिधी, ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया**

> प्रशिक्षितांना कंत्राटी मजुर करीत आहे मदत
>
> बोमा पध्दतीने वन्यप्राण्यांना पकडण्याचे काम सुरु आहे. यासाठी वनविभागाचे प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी यांच्यासह काही कंत्राटी तत्वावरील मजूरांची मदत घेऊन वन्यप्राण्यांना पकडण्यात येत आहे. मजुर हे कोणत्या कम्युनिटीचे आहेत, हे पाहून काम दिल्या जात नाही. त्यांना केवळ मदतीसाठी ठेवले आहे.
>
> **धैर्यसिंग पाटील,**
> **डीसीएफ अमरावती.**

### वन्यप्राणी हार्ट अटॅकने मरू शकतात - सागर मैदानकर

हे प्राणी जिवंत अथवा मृत पकडवयास सांगितले गेले आहे. शास्त्रीय दृष्ट्या सुद्धा या प्राण्यांना अशा प्रकारे पकडल्यास त्यांना हार्ट अटॅक येऊन मरण्याची भीती असते, तरीही गेल्या एक महिन्यापासून वन्यप्राण्यांना पकडण्यासाठी हिंसाचार सुरु आहे. परंतु या कामामध्ये पकडले जाणारे वन्यप्राणी हे संवर्ग 1 व संवर्ग 2 या सूचीमध्ये असल्याने त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासातून हटविणे, त्यांना चुकीच्या पद्धतीने पकडणे, शिकाऱ्यांकडून पकडून घेणे, त्यांना इजा होईल अशे कृत्य करणे, वन अधिनियम कायदा 1972 अंतर्गत गुन्हा आहे. वन विभागाने सदर काम तात्काळ थांबविणे आवश्यक आहे. अन्यथा प्राणी प्रेमी, या संदर्भात वरिष्ठांकडे तक्रार दाखल करणार आहे, अशी माहिती सागर मैदानकर यांनी दिली.

# शहरातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था सुधारा!




## पोलीस आयुक्तांना प्रिती बंड यांचे निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.2)** - गेल्या अनेक महिन्यांपासून अमरावती शहरातील कायदा व सुव्यवस्था ढासळत असून, गुन्हेगारीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. त्यामूळे नागरिकांमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण आहे. ही बाब लक्षात घेऊन अमरावती शहर पोलिसांनी कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी तातडीने आवश्यक ती पावले उचलावीत, या आशयाचे निवेदन शहर पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांना प्रीती संजय बंड यांच्या नेतृत्वातील एका शिष्टमंडळाने दिले.

सीपी रेड्डी यांच्यासह त्यांच्या समर्थक अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर करताना प्रीती बंड म्हणाल्या की, गेल्या काही महिन्यांपासून अमरावती शहरात एकामागून एक खूनांची मालिका सुरू आहे. तसेच गेल्या आठवड्यात दुर्योधन कडू नावाच्या व्यक्तीचा शिरच्छेद करून त्याचा मृतदेह अकोली परिसरात फेकला. त्यामुळे म्हाडा परिसरातील शाळा आणि कोचिंग क्लासला जाणाऱ्या मुलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अशा स्थितीत या निर्जन भागात पोलिसांची गस्त सुरू करून येथे तात्पुरती पोलिस चौकीही उभारण्यात यावी. याशिवाय प्रीती बंड यांनी असेही सांगितले की, विधानसभा निवडणुकीनंतर गोपाल नगर परिसरात राहणारा त्यांचा कार्यकर्ता संजय गव्हाळे यांना अनेकदा धमकीचे फोन आले. तक्रार नोंदवूनही राजापेठ पोलिसांनी संबंधितांवर अद्याप कोणतीही कारवाई केलेली नाही.

प्रीती बंड यांच्या म्हणण्यानुसार, शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करण्याची भूमिका त्यांनी नेहमीच बजावली. मात्र गुन्हेगारी प्रवृत्तींना पोलिसांनी संरक्षण दिल्यास ते खपवून घेतले जाणार नाही. निवेदन देताना माजी आमदार ज्ञानेश्वर धाणे पाटील यांच्यासह नाना नागमोते, नितीन तारेकर, संजय शेटे, अनिल नंदनवार, माया महाडिक, अलका अंबडकर, उमेश घुरडे, रक्षा सरदार, वर्षा यादव, भैय्या यादव, निर्मळ, गुलाम नबी, हबीब, नितीन ठाकरे, मनोज आवारे, हरीश चवके, नागोराव भाटकर, ए. रफिक, अनिल नंदनवार, गजानन डोंगरे, गजानन वैद्य, मुकद्दर खान पठाण, नीलेश जामठे, योगेंद्र लकडे, प्रमोद निर्मळ आदी उपस्थित होते.



# अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची निवड

## राष्ट्रीय अध्यक्षपदी मनोहर सुने तर राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी युसुफ खान

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,(दि.2)**- अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या आजीव सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा रविवार 1 डिसेंबर रोजी चांदूर रेल्वे परिसरातील हॉटेल गोविंदवाडा येथील हॉलमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष मनोहर सुने यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यात सन 2025 ते 2030 कालावधीसाठी अ.भा.ग्रा. पत्रकार संघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये राष्ट्रीय अध्यक्षपदी मनोहर सुने, राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी युसुफ खान, राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, प्रदीप जोशी, राष्ट्रीय संघटक कैलासबापू देशमुख, राष्ट्रीय सरचिटणीस सुरेश सवळे, राष्ट्रीय चिटणीस अशोक पवार, राष्ट्रीय महिला संघटक सौ. जयश्री पंडागरे, राष्ट्रीय कोषाध्यक्ष अशोक याऊल, राष्ट्रीय प्रवक्ता माणिकराव ठाकरे, राष्ट्रीय विधी सल्लागार सौ. किरण भुते, राष्ट्रीय सदस्य अंबादास सिनकर, बाळासाहेब सोरगीवकर, प्रा. रवींद्र मेंढे, अभिमन्यू भगत यांचा समावेश आहे. तर महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, राज्य संघटक संजय कदम, अंबादास सिनकर, राष्ट्रीय कार्यालय प्रमुख पदी बाबाराव खडसे यांची निवड करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे सर्व राज्य सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बाजार समीतीच्या भुसंपादना निर्णया बाबतीत तालुक्यात उत्सुकता

## जिल्हाधीकारी कार्यालयाचे निर्णयाची प्रतीक्षा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुर्जी,(दि.2)** - अंजनगाव सुर्जी ची कृषी उत्पन्न बाजार समिती आपल्या बरे वाईट कार्यकर्तुत्वाने सदैव प्रकाश झोतात राहलेली आहे. त्यापैकी सदर शेत जमीनी चे भूसंपादन प्रकरण भाग आहे. सन-2003 मध्ये जिल्हाधिकारी यांचे समोर प्रथम सादर केलेला भूसंपादनाचा प्रस्तावाबाबत आक्षेप, आरोप, तक्रार अश्या विविध न्यायालयीन प्रक्रीयेतून कसाबसा निस्तारीत सन-2019 पर्यंत जिल्हाधिकारी यांचे अंतीम आदेशापर्यंत येऊन पोहचला. परंतू सन-2015 ते 2021 या कार्याकाळातील कार्यान्वीत संचालकांनी भुसंपदाना च्या बाबतीत त्यांनी दाखविलेली सहेतुक आनास्था त्यातुन तत्कालीन संचालक मंडळावर झालेले आरोप त्यांची बरखास्तगी व सहा वर्षाच्या अपात्रते सारखी मानहानीकारक कारवाई राज्य शासनामार्फत झाली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सन-1988 मध्ये अंजनगाव सुर्जी कृषि उत्पन्न बाजार समिती करीता 0.46 हे. आर. आणि 0.08 हे. आर. जमीनीचे क्षेत्र आरक्षित केले आहे. सन-1988 पासून योग्य मुदतीत सदर शेत जमीन कृषि उत्पन्न समितीला हस्तांतरीत झाली असती तर सदर शेत जमीन अंदाजे रक्कम 5-7 लक्ष रुपयात समितीच्या नावे होऊन आज रोजी पर्यंत सदर शेत जमीनीचा वापर करुन समितीला लाखो रुपये उत्पन्न प्राप्त झाले असते.

कृषि उत्पन्न बाजार समिती अंजनगांव यांनी सदर शेत जमीनीचा मोबदला म्हणून अंदाजे 2 कोटी 58 लाख रुपयाचा भरणा जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात करण्यात आलेला आहे. परंतू सदर रक्कम भरुन सुध्दा आज रोजी समितीला जमीनीचा ताबा अप्राप्त आहे. सन-2003 मध्ये सदर भूसंपादन प्रक्रीया जुन्या भू-संपादन कायदयानुसार चालविण्यात येत होती. सन-2021 मध्ये प्रशासकिय कार्यकाळात नविन भू-संपादन कायदा अस्तित्वात आल्यानूसार सदर प्रकरण नविन कायदयानूसार ठराव पारीत करुन जिल्हाधिकारी यांना भूसंपादन प्रकरण सादर करण्यात आले. सन-2023 मध्ये बाजार समितीच्या झालेल्या निवडणूकीत समितीचे कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी नवनियुक्त संचालक मंडळाला एक हाती कौल देऊन समितीच्या भूसंपादन प्रक्रीयेत मागील संचालक मंडळाने घेतलेला निर्णय चुकीचा असल्यामुळे त्याबाबत रोष जाहीर केला असल्याचे निदर्शनास आले. नवीन संचालक मंडळाने सदर भूसंपादनाचा ध्यास घेतला असताना अजुनही काही व्यक्ती बाजार समितीच्या बाजुने भुमीआधीग्रहन होऊ नये म्हणुन प्रयत्नशिल असुन बाजार समितीच्या हातातुन ही कोट्यवधी रुपयांची जमीन जाण्याकरीता भुमाफीयाला रसद पुरवीत असल्याची माहिती आहे. याचीच फलश्रुती या प्रकरणी 04 मार्च 2024 रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी यात त्रुटीपत्र देत कार्यवाहीत खोडा निर्माण केला, परंतू सध्या कार्यान्वीत संचालक मंडळाने सदर त्रुटीपत्राचा पाठपुरावा करीत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करुन तसेच जिल्हाधिकारीऱ्यांना वारंवार भेटून पाठपुरावा करुन सदर त्रुटी पत्राबाबत त्यांना फेर विचार करण्यास भाग पाडले.



आज रोजी अस्तीत्वात असलेल्या संचालक मंडळाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनावर कार्यालया कडुन दोन्ही पक्षांना नोटीस काढून आज रोजी करोडो रुपये किंमतीच्या भु- संपादनाचा दाव्या संबंधीचे सुनावणी जिल्हाधिकारी यांचेकडे दोन्ही पक्षांचे वार पटलावर झाले. जागा अधिग्रहण विषयीचे दोन्हीही बाजुचे युक्तीवाद संपलेले असुन कोनत्याही वेळी जिल्हाधीकारी आपला अंतीम निर्णय जाहीर करण्याची शक्यता असुन धनाढय भुमालक व बाजार समितीच्या जागे संमधीच्या अत्यंत प्रतीष्ठेच्या लढाईत जिल्हाधिकारी धनशक्तीच्या बाजुने कि जनशक्तीच्या बाजुने निर्णय देतात या कडे तालक्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष केंद्रित आहे.

समिती च्या संचालक मंडळासोबत चर्चा केली असता तसेच तालुक्यातील काही प्रतीष्ठित शेतकरी यांचे सोबत सदर भू-संपादनाच्या होणाऱ्या निर्णयावर चर्चा केली असता समितीला जागा मिळेल याबाबत संदेह व्यक्त करण्यात येत आहे. कारण भुसंपादनाच्या निर्णया बाबतीत काही संदेहास्पद घडामोडींचा सुगावा लागल्यामुळे बाजार समिती ने सदर प्रकरणात निर्णय लागलेला नसतांना उच्च न्यावालची तयारी केल्याचे समजते.याबाबत प्रतीनिधीने माहीती घेतली असता जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत बाजार समितीस दिलेल्या भु-संपदना बद्दलचा आदेश सर्व काही परीस्थीती सांगुन जातो. सदर आदेशात जिल्हाधिकारी कार्यालयाची बाजु संदेह उत्पन्न करत असुन या आदेशात बाजार समिती ने दाखल केलेल्या प्रस्तावात केवळ नाममात्र दोन त्रुटया दाखवत प्रकरण नव्याने प्रस्ताव दाखल करण्यास सुचविण्यात आले. भारतीय न्याय व्यवस्थेच्या आणि राज्य घटने मधिल नमूद मूलभूत तत्वांपैकी महत्वाचे छ्वह्वद्यह्वद्वष्ठ्ठ स्त्रद्दद्यड्ड4द्गस्त्र छ्वह्वद्यह्वद्वष्ठ्ठ स्त्रद्दठ्ठद्बद्दस्त्र तत्वांचा बाजार समिती च्या प्रकरणात पुर्णपणे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी हे तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतकरी संस्थेला सन 1988 पासून प्रलंबीत प्रकरणात न्याय देतील का? अथवा पून्हा नव्याने त्रुटी काढून समितीस फीर से गिनो करुन भू-संपादनाचा प्रस्ताव नव्याने दाखल करावा असा आदेश पारीत करतील का या बाबत अंजनगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना व सहकार क्षेत्रात तर्कवितर्क काढण्यात येत आहेत.

# कडूंच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्विकारत उपसभापती गायकींचा राजीनामा

## तालुक्यातील राजकारणात खळबळ

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,(दि.2)** - राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या अनपेक्षित निकालाने सर्वांनाच धक्का बसला आहे. अचलपूर मतदार संघातून चार वेळा आमदार असलेले बच्चू कडू यांचा या निवडणुकीत पराभव झाल्याने त्या पराभवाची जबाबदारी स्विकारत कृषि उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती गजेंद्र गायकी यांनी सभापतींकडे आपला राजीनामा सुपूर्द केला. गायकी यांच्या राजीनाम्यामुळे तालुक्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे. अचलपूर मतदार संघ हा प्रहारचा बालेकिल्ला संबोधला जातो. चांदुर बाजार तालुक्यातून प्रहारची खरी सुरुवात असून या ठिकाणी प्रहारची उत्तम बांधणी करण्यात आलेली आहे. या ठिकाणी अनेक स्थानिक स्वराज्य संस्था तसेच कृषि उत्पन्न बाजार समितीवर प्रहारचे सर्व 18 पैकी 18 संचालक निवडून एक हाती वर्चस्व आहे. अश्या परिस्थितीत चांदुर बाजार तालुक्याची जबाबदारी ही उपसभापती गजेंद्र गायकी यांच्यावर असल्याने त्यांना बच्चू कडूंसाठी अपेक्षित मतदान मिळविण्यासाठी यश मिळाले नाही. माजी आ. बच्चू कडू यांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास व प्रहार कार्यकर्त्यांच्या विश्वासाला मी सार्थ ठरू शकलो नाही, म्हणून मी माझ्या उपसभापती या पदाचा राजीनामा देत असल्याचे गायकी यांनी नमूद केले. त्यामुळे त्यांनी या पराभवाची जबाबदारी स्विकारत कृषि उत्पन्न बाजार समिती सभापतींकडे आपला राजीनामा सुपूर्द केला.

बच्चू कडू हे राजीनामा स्विकारणार किंवा नाही हे अजूनही गुलदस्त्यात आहे. परंतु प्रहारच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपापल्या पदाचा राजीनामा देण्याचे सूचक वक्तव्य या निमित्ताने केले आहे.आपल्या भावनांना मार्ग मोकळा करून देण्यात उपसभापती गजेंद्र गायकी यांनी उचललेले हे पाऊल तालुक्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारे ठरले आहे. बच्चू कडू यांचा पराभव अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी व जनतेच्या जिव्हारी लागला असुन गजेंद्र गायकी यांच्या निमित्ताने राजीनामासत्र सुरू झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. प्रहारचे अनेक पदाधिकारी राजीनामा देण्याच्या तयारीत असून यामुळे तालुक्यातील राजकारण ऐन हिवाळ्याच्या थंडीत गरम होणार आहे. चांदुर बाजार आणि अचलपूर तालुक्यातील अनेक पदाधिकाऱ्यांनी बच्चू कडू यांच्या पराभवाची जबाबदारी स्विकारली असून अनेक पदाधिकारी येत्या काही दिवसांत आपला राजीनामा देऊन या पराभवाची कारणमीमांसा करणार असल्याचे समजते.

### मी प्रहारचा पक्का मावळा



आपल्याकडे असलेल्या पदांमुळे प्रहारची ओळख नाही तर प्रहारच्या माध्यमातून होत असलेल्या सेवेमुळे प्रहारची राज्यात ओळख आहे. सेवेचा झेंडा घेऊन आम्ही बच्चू कडू यांच्या खांद्याला खांदा लावून पुन्हा उभारी घेऊ आणि जनतेचे प्रश्न सोडवू. पद माझ्यासाठी महत्वाचे नाही. मी प्रहारचा पक्का मावळा आहे त्यामुळे आज कोणत्याही पदापेक्षा बच्चू कडू यांच्यासोबत सेवा करणे आणि जनतेची कामे करणे याला आपले प्राधान्य असेल.

**-गजेंद्र गायकी,**
**उपसभापती कृउबा समिती, चांदूर बाजार.**

# अवांतर वाचनाने व्यक्तिमत्त्व विकासात भर पडतो!

## गटशिक्षणाधिकारी संदीप बोडके; उर्दू वाचन अभियान टप्पा



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,(दि.2)** - आजच्या इंटरनेट च्या काळात वाचन कमी झाले आहे त्यात वाचनालयात जाऊन पुस्तके वाचन हेही कमी झाले आहेत, आपल्या शाळेत विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासंबंधी महत्व लक्षात आणून द्या कारण अवांतर वाचनाने व्यक्तिमत्त्व विकासात भर पडतो असे मत गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांनी मांडले.

उर्दू वाचन कार्यक्रम अंतर्गत आज दि.02 डिसेंबर 2024 रोजी उर्दू शिक्षकांचे प्रशिक्षणाचे आयोजन गटसाधन केंद्र येथे तीन तालुके मिळून करण्यात आले होते त्यात चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, तिवसा या तिन्ही तालुक्याचे शिक्षकांनी या प्रशिक्षणा अंतर्गल हजेरी लावली.

सदर प्रशिक्षणाचे उद्दीष्ट उर्दू वाचन अभियान अंतर्गत वेगवेगळ्या माध्यामातून मुलांची वाचन क्षमता विकसीत करणे आहे. या साठी आठवड्यातून दोन तास वाचना साठी देण्यात आले असल्याचे यावेळी सांगण्यात आले सदर प्रशिक्षणाला मार्गदर्शक म्हणून जमीर खान रशीद खान, शफिक बेग हमीद बेग, नवेद इकबाल हफिजऊला खान, वसीम अहेमद शेख नूर, आसिफ इक्बाल मो अफजल, अझहर हुसेन मुनाज्जर हुसेन यांनी केले, यावेळी या प्रशिक्षणाला विषय साधन व्यक्ती विवेक राऊत, यांनीही मार्गदर्शन केले.